# मुंबई विद्यापीठ

**विद्यापीठ अधिकार मंडळाच्या निवडणूकीसाठी नोंदणीकृत पदवीधर मतदार संघाची दुरूस्ती मतदार यादी प्रसिध्द करणेबाबत.**

## जाहीर प्रकटन

**क्र.नि.वि./आय.सी.डी/२०२३-२४/१८३.**

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम २८(२)(न)[28(2)(t)] अन्वये नोंदणीकृत पदवीधर निवडून देण्याची तरतुद आहे.

महाराष्ट्र शासनाने निर्गमित केलेले सन २०१७ चे एकरूप परिनियम क्र. १ मधील मुद्दा क्र. ८ मधील तरतुदीनुसार तयार करण्यात आलेली नोंदणीकृत पदवीधरांची तात्पुरती मतदार यादी तसेच अपात्र ठरलेल्या अर्जांची यादी (कारणासहीत) **क्र.नि.वि./आय.सी.डी/२०२२-२३/१३४९, दिनांक २८ फेब्रुवारी, २०२४** रोजी विद्यापीठाच्या https://mu.ac.in या संकेतस्थळावरील **Election 2022** या लिंकवर किंवा https://mu.eduapp.co.in या संकेतस्थळावर Electoral Roll या सदराखाली (Tab) प्रसिध्द करण्यात आली होती. सदर तात्पुरती मतदार यादीवर दिनांक ०४ मार्च, २०२४ पर्यंत आक्षेप मागविण्यात आले होते. त्यावरील आक्षेपांची नोंद घेऊन दुरूस्त मतदार यादी विद्यापीठाच्या https://mu.ac.in या संकेतस्थळावरील Election 2022 या लिंकवर किंवा https://mu.eduapp.co.in या संकेतस्थळावर Electoral Roll या सदराखाली (Tab) प्रसिध्द करण्यात येत आहे. तसेच दुरूस्ती मतदार यादी प्रसिध्द झाल्याबद्दलची माहिती संक्षिप्त संदेश (SMS) द्वारे संबंधितांना कळविण्यात येत आहे.

पुढे आपणांस असे कळविण्यात येत आहे की, सदर दुरूस्ती मतदार यादीमध्ये वगळलेल्या किंवा चुकीच्या कोणत्याही नोंदी निदर्शनास आल्यास सदर नोंदीबाबत **शुक्रवार, दि. ०५ जुलै, २०२४ ते मंगळवार, दि. ०९ जुलै, २०२४** पर्यंत स्पष्टीकरणासह विद्यापीठाच्या संकेतस्थळावर ऑनलाईन पध्दतीने मा. कुलगुरूंना अपिलाद्वारे निदर्शनास आणून द्याव्यात. ऑनलाईन पध्दती व्यतिरिक्त इतर कोणत्याही पध्दतीने मा.कुलगुरूंकडे अपील करू नये. इतर पध्दतीने मा.कुलगुरूंकडे अपील केल्यास त्याची नोंद घेतली जाणार नाही.

तसेच मतदारांने आपला अर्ज कोणत्या यादीमध्ये आहे हे शोधण्यासाठी **"Search your Application"** या **Tab** वर **Click** करावे, त्यामध्ये मतदाराने आपला मोबाईल नंबर किंवा अर्ज क्रमांक टाकून अर्ज पात्र किंवा अपात्र यादीमध्ये आहे याची माहिती घ्यावी.

**सदर नोंदी मा. कुलगुरूंच्या निदर्शनास आणून देण्याची ऑनलाईन पध्दत खालीलप्रमाणे आहे.**

१. विद्यापीठाच्या https://mu.ac.in या संकेतस्थळावरील Election 2022 या लिंकवर किंवा https://mu.eduapp.co.in या संकेतस्थळावर जाऊन निवडणूकीच्या सॉफ्टवेअरमधील **Login/Registration** या **Tab** ला **Select** करावे.

२. संबंधीतांनी आपल्या **Login** मध्ये जाऊन तेथे उपलब्ध करून दिलेल्या **Add Grievance** या **Tab** वर **Click** करून तेथील रकान्यामध्ये सदर बाब स्पष्टीकरणासह नोंदवावी. सदर स्पष्टीकरणाबाबत असणारे कागदपत्रे दिलेल्या संबंधीत जागेवर अपलोड करावेत.

दिनांक : ०४ **जुलै**, २०२४
ठिकाण : मुंबई - ४०० ०३२.

स्वाक्षरीत/-
(डॉ. बळीराम गायकवाड)
प्रभारी कुलसचिव तथा
निवडणूक निर्णय अधिकारी